**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा**
**<u>अधिकार अधिनियम, २००९</u>**
**स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आरटीई-१११४/प्र.क्र.११९/एस एम-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० ऑगस्ट, २०१४

<u>वाचा -</u>

1. **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षाणाचा अधिकार अधिनियम, २००९**
2. **महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११**
3. **शासन निर्णय क्रमांक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.आरटीई-२०१३/प्र.क्र.२०/प्राशि-१, दिनांक ३१/१२/२०१३**

<u>प्रस्तावना -</u>

केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान-विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अे) अन्वये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (No. ३५, २००९), केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या २७/०८/२००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६/०२/२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक ०१/०४/२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमूद केले आहे.

२. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जाऊ शकतात, याद्दष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्विकारली आहे.

३. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील प्रकरण १ च्या कलम २ (h) मध्ये स्थानिक प्राधिकरणाची व्याख्या दिलेली आहे. तसेच प्रकरण ३ च्या कलम ९ नुसार १३ कर्तव्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. याबाबत राज्य शासनाने भौगोलिक क्षेत्रानुसार स्थानिक प्राधिकरणे दिनांक ३१/१२/२०१३ च्या शासन निर्णयानुसार घोषित केली आहेत. तसेच त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहीत केल्या आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ नुसार जिल्हा परिषदेची कर्तव्ये विहीत केली आहेत. त्यामध्ये ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्तीनुसार सुधारणा करण्यात आल्या आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची अंमलबजावणी करणे स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे. त्यानुसार जिल्हा परिषद, महानगरपालिका, पंचायत समिती, नगर परिषद, नगर पालिका, नगर पंचायत, ग्रामपंचायत यांनी पार पाडावयाच्या जबाबदारी व कर्तव्य विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास इयत्ता आठवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत नजिकच्या शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी कायद्याने शासन व स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्यासाठी कायद्यातील कलम ९ मध्ये स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये विहीत करण्यात आली आहेत. त्यामधील काही कर्तव्ये स्थानिक प्राधिकरण या नात्याने जिल्हा परिषद, महानगरपालिका, पंचायत समिती, नगर परिषद, नगर पालिका, नगर पंचायत व ग्रामपंचायत स्तरावरील आहेत. याबाबतचा तपशील सोबतच्या परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये देण्यात आला आहे.

२. जिल्हा परिषद, महानगरपालिका स्तरावर, स्थायी समिती, शिक्षण समिती, सर्वसाधारण समिती **अशा विषय** समित्या कार्यरत असून त्यामध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश आहे. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक प्राधिकरण व लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. यासाठी विविध स्तरावरील अंमलबजावणी व आढावा घेण्यासाठी कायद्यातील तरतुदींची जबाबदारी

विहीत करण्यात आली आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषद, महानगरपालिका, पंचायत समिती, नगर परिषद / नगर पालिका / नगर पंचायत, ग्रामपंचायत यांनी पार पाडावयाची कर्तव्ये **परिशिष्ट-अ** व **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे निश्चित करून देण्यात येत आहेत ती त्यांनी पार पाडणे अनिवार्य राहील. त्यामुळे ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास आठवीपर्यंतचे मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा अधिकार प्राप्त करून देता येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८२०१८०४२९९७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2014.08.20 18:11:08 +05'30'

( राजेंद्र पवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण.
३. मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण.
४. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व).
५. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व).
६. सर्व संसद सदस्य /विधानमंडळ सदस्यमा.
७. मुख्य सचिव
८. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन विभाग.
९. अध्यक्ष, राज्य बालहक्क संरक्षण आयोग.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व मंत्रालयीन विभाग
१२. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती प्रसिध्दीकरिता)

१३.सर्व जिल्हाधिकारी.
१४.सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१६.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१७.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०.शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२१.संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
२२.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
२३.संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.
२४.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
२५.सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
२६.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद.
२७.सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगर परिषद.
२८. सर्व प्रशासन अधिकारी, नगर परिषद/कटक मंडळे.
२९.शिक्षण निरीक्षक (पश्चिम/दक्षिण/उत्तर), बृहन्मुंबई.
३०.निवड नस्ती (एसएम-१ कार्यासन).

**परिशिष्ट-अ**

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९**

**स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये**

**शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.आरटीई-१११४/प्र.क्र.११९/एस एम-१ चे जोडपत्र**

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद** | **पंचायत समिती** | **ग्रामपंचायत** |
| **सक्षम प्राधिकारी** | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती | केंद्र प्रमुख |
| **कार्यक्षेत्र** | ग्रामीण क्षेत्रातील सर्व शाळा तसेच नगर पालिका व कटक मंडळे कार्यक्षेत्रातील त्यांचेद्वारा न.पा. व कटक मंडळे संचलित शाळा वगळून इतर शाळा | पंचायत समिती कार्यक्षेत्रातील सर्व शाळा (न.पा. व कटक मंडळ संचलित शाळा वगळून) | जिल्हा परिषद संचलित शाळा |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(क) प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविणे** | | |
| | ▪ अपंग समावेशित शिक्षणातील बालके, अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीची बालके, दुर्बल व वंचित घटकातील बालके आणि मुलींचे शिक्षण याबाबतीत पर्यवेक्षण आणि याद्दच्छिक (Random) तपासणी करणे.<br>▪ तालुका व गाव स्तरावर शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणी बाबत संनियंत्रण करणे. | ▪ अपंग समावेशित शिक्षणातील बालके, अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीची बालके, दुर्बल व वंचित घटकातील बालके आणि मुलींचे शिक्षण याबाबतीत पर्यवेक्षण आणि याद्दच्छिक (Random) तपासणी करणे.<br>▪ पंचायत समिती कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांच्या शाळा प्रवेशासाठी शासनाच्या, | ▪ अपंग समावेशित शिक्षणातील बालके, अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीची बालके, दुर्बल व वंचित घटकातील बालके आणि मुलींचे शिक्षण याबाबतीत पर्यवेक्षण आणि याद्दच्छिक (Random) तपासणी करणे.<br>▪ ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांच्या शाळा प्रवेशासाठी शासनाच्या, |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत |
| | | अनुदानित, विना अनुदानित, खाजगी शाळांची माहिती संकलित करणे व ती अद्ययावत ठेवणे.<br>▪ पंचायत समिती कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांची माहिती जतन करणे, दरवर्षी अद्यावत करणे. हे काम योग्य रितीने होते यावर नियंत्रण ठेवणे.<br>▪ पंचायत समिती स्तरावर शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत संनियंत्रण करणे.<br>▪ सर्व बालके शाळेत प्रविष्ट झाली आहेत याची खात्री करणे.<br>▪ तालुक्यातील २५ टक्के आरक्षणांतर्गत द्यावयाच्या प्रवेशाची प्रक्रिया पारदर्शक असल्याची खात्री करणे व आवश्यक मार्गदर्शन करणे.<br>▪ शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी | अनुदानित, विना अनुदानित, खाजगी शाळांची माहिती संकलित करणे व ती अद्ययावत ठेवणे.<br>▪ ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांची माहिती जतन करणे, दरवर्षी अद्यावत करणे जेणेकरून स्थलांतरीत झालेल्या व शाळाबाह्य बालकांची माहिती मिळेल.<br>▪ सर्व बालके शाळेत प्रविष्ठ झाली याची खात्री करणे.<br>▪ शाळाबाह्य बालकांना शाळेत दाखल करून घेण्यासाठी बालकांचे व त्यांच्या पालकांचे उद्बोधन करून बालकास शाळेत दाखल करून घेणे.<br>▪ २५ टक्के आरक्षणांतर्गत द्यावयाच्या प्रवेशाची प्रक्रिया पारदर्शक असावी. जेणेकरून |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद** | **पंचायत समिती** | **ग्रामपंचायत** |
| | | प्रयत्न करणे. | प्रत्यक्ष लाभार्थींना प्रवेश मिळेल.<br>▪ शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्रयत्न करणे. |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(ख) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नजिकच्या शाळेच्या उपलब्धतेची सुनिश्चिती करणे.** | | |
| | ▪ महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदीनुसार बालकाच्या नजिकच्या क्षेत्रामध्ये शाळा उपलब्ध असल्याची खात्री करणे.<br>▪ शिक्षण हक्क कायद्याबाबत अधिनस्त यंत्रणेची जाणीव जागृती करणे.<br>▪ नजिकची शाळा सुरू करावयाची असल्यास तालुका व गाव पातळीवर सर्वेक्षण करून खात्री करून घेणे. | ▪ निकषानुसार तालुक्यातील प्रत्येक गावाच्या नजिकच्या क्षेत्रात शाळा उपलब्ध असल्याची खात्री करणे.<br>▪ शाळांच्या मागणीविषयीचे प्राप्त झालेले प्रस्ताव पडताळणी करून सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे.<br>▪ तालुका / ग्रामपंचायत स्तरावरील पदाधिकाऱ्यांचे शिक्षण हक्क कायद्याविषयी उद्बोधन करणे. | ▪ निकषानुसार नजिकच्या क्षेत्रात शाळा उपलब्ध नसल्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडे शाळा उपलब्धतेबाबत सर्वेक्षण करून प्रस्ताव सादर करणे.<br>▪ नवीन प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेसाठी जागा उपलब्ध असल्याबाबतची खात्री करून घेणे.<br>▪ स्थानिक पातळीवर समाज, पालक, विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्यामध्ये कायद्याची जनजागृती करणे, त्यांची कर्तव्ये व |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद** | **पंचायत समिती** | **ग्रामपंचायत** |
| | | | जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणे. |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(ग) वंचित व दुर्बल घटकातील बालकांस कोणत्याही कारणावरुन प्राथमिक शिक्षण घेण्यापासून ते पूर्ण करण्यापासून त्यास प्रतिबंध केला जाणार नाही, याची सुनिश्चिती करणे.** | | |
| | ▪ बालकाशी होणाऱ्या भेदभावाबाबत अधिनस्त यंत्रणेची जाणीव जागृती करणे.<br>▪ प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असताना वंचित गट व दुर्बल घटकातील बालकाशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करणे. | ▪ वंचित गट व दुर्बल घटकातील बालकांची शाळेतील उपस्थिती व नियमितता याबाबत खात्री करणे.<br>▪ प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असताना वंचित गट व दुर्बल घटकातील बालकाशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करणे. | ▪ वंचित गट व दुर्बल घटकातील बालकांची शाळेतील उपस्थिती व नियमितता याबाबत खात्री करणे.<br>▪ प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असताना वंचित गट व दुर्बल घटकातील बालकाशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करणे. |
| | **घ) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणाऱ्या चौदा वर्षे वयापर्येतच्या बालकांचा अभिलेख विहित करण्यात येईल अशा रितीने ठेवणे** | | |
| | ▪ तालुका / गाव स्तरावर बालकांशी संबंधित सर्व वैयक्तिक अभिलेखे ठेवण्यात येतील यासाठी पर्यवेक्षीय यंत्रणेने खबरदारी घ्यावी.<br>▪ यु-डाईस माहितीचे एकत्रिकीकरण व संगणकीकरण करून राज्यास उपलब्ध करणे.<br>▪ राज्य स्तरावरून पुरविण्यात | ▪ शाळेमार्फत ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांची वैयक्तिक अभिलेखे अद्यावत ठेवले आहेत किंवा नाही याची खात्री करणे.<br>▪ यु-डाईस माहितीचे एकत्रिकीकरण व | ▪ प्राथमिक शिक्षणाच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी बालकाचे वय जन्म-मृत्यू विवाह नोंदणी अधिनियम, १९८६ च्या तरतुदीनुसार देण्यात आलेल्या जन्म दाखल्याच्या |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद** | **पंचायत समिती** | **ग्रामपंचायत** |
| | आलेल्या प्रपत्रात नजिकच्या शाळेच्या माहितीचे एकत्रिकीकरण व संगणकीकरण करून राज्यास उपलब्ध करणे. | संगणकीकरण करून जिल्ह्यास उपलब्ध करून देणे.<br>▪ राज्य स्तरावरून पुरविण्यात आलेल्या प्रपत्रात नजिकच्या शाळेच्या माहितीचे एकत्रिकीकरण व संगणकीकरण करून जिल्ह्यास उपलब्ध करणे. | आधारे किंवा विहीत करण्यात आलेल्या दस्ताऐवजाच्या आधारे प्रवेश निर्धारित करणे.<br>▪ शाळेमार्फत ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांचे वैयक्तिक अभिलेखे अद्यावत करून जतन करणे.<br>▪ असुरक्षित बालकांच्या गटामध्ये दुर्लक्षित / निराधार विशेष गरजाधिष्ठित, एकच पालक असलेली बालके, अनाथ / बेघर, इ. बालकांच्या नोंदी घेणे.<br>▪ राज्य स्तरावरून पुरविण्यात आलेल्या प्रपत्रात नजिकच्या शाळेच्या माहितीचे एकत्रिकीकरण व संगणकीकरण करून जिल्ह्यास उपलब्ध करणे. |
| | **(ड) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणाऱ्या प्रत्येक बालकाच्या शाळा प्रवेशाची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची खातरजमा करून त्याचे संनियंत्रण करणे** | | |
| | ▪ कार्यक्षेत्रातील बालकांचे प्रवेश व उपस्थिती याबाबत संनियंत्रण | ▪ कार्यक्षेत्रातील बालकांचे प्रवेश व | ▪ प्रवेशापासून कोणतेही बालक |

| | ग्रामीण | | |
|---|---|---|---|
| | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत |
| | करणे.<br>▪ प्रवेशासंबधी येणारे अडथळे व उपस्थिती टिकविण्याबाबत गाव स्तरावर संनियंत्रण व मार्गदर्शन करणे. | उपस्थिती याबाबत संनियंत्रण करणे.<br>▪ स्थलांतरीत (बाहेरून येणारे व बाहेर जाणारे) बालकांचे अभिलेखे शाळा स्तरावर जतन करून अद्यावत ठेवले आहेत किंवा नाही याची खात्री करणे. | वंचित राहू नये याबाबतची खात्री करणे.<br>▪ स्थलांतरीत (बाहेरून येणारे व बाहेर जाणारे) बालकांचे अभिलेखे जतन करून ठेवणे व ते अद्यावत करणे |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(च) शाळेची इमारत, अध्यापन कर्मचारीवर्ग आणि अध्यापन साधन सामग्री तसेच पायाभूत सविधा पुरविणे** | | |
| | ▪ कार्यक्षेत्रातील शाळा शिक्षण हक्क कायद्यानुसार व विद्यार्थी शिक्षक प्रमाणानुसार असाव्यात. जर नसल्यास जिल्हा परिषदेने आपल्याकडे उपलब्ध असलेल्या स्त्रोतातून शाळा शिक्षण हक्क कायद्यातील निकषानुसार पूर्तता करणे.<br>▪ प्राथमिक शाळांना शैक्षणिक साहित्य पुरविणे तसेच खेळाचे मैदान उपलब्ध करून देणे.<br>▪ आवश्यकतेप्रमाणे नवीन शाळा स्थापन करावयाची असल्यास,<br>- बांधकामासाठी लागणारा निधी तात्काळ वितरीत होईल याची खात्री करणे.<br>- शिक्षक उपलब्ध करून घेणे. शिक्षकांचे समायोजन व | ▪ कार्यक्षेत्रातील शाळा शिक्षण हक्क कायद्यानुसार व विद्यार्थी शिक्षक प्रमाणानुसार असल्याबाबतची खात्री करणे याबाबतची माहिती जिल्हा स्तरावर पुरविणे.<br>▪ अपुरा शिक्षक वर्ग, शिक्षकांची कार्यक्षमता / शिक्षकांची अनुपस्थिती याबाबत उद्भवणाऱ्या समस्या सोडविणे.<br>▪ प्राथमिक शाळांना शैक्षणिक साहित्य | ▪ शिक्षक-विद्यार्थी प्रमाण शाळेत राखण्याबाबत उद्भवणाऱ्या समस्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पत्र व्यवहार करावा.<br>▪ अपुरा शिक्षक वर्ग, शिक्षकांची कार्यक्षमता / शिक्षकांची अनुपस्थिती याबाबत उद्भवणाऱ्या समस्या सोडविणे.<br>▪ प्राथमिक शाळांना शैक्षणिक साहित्य पुरविणे तसेच खेळाचे मैदान उपलब्ध करून देणे. |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत |
| | विषयनिहाय नियुक्त्या करणे. | पुरविणे तसेच खेळाचे मैदान उपलब्ध करून देणे. | |
| | **(छ) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेली विशेष प्रशिक्षण सुविधा पुरविणे आणि स्थलांतरीत कुटुंबातील बालकांचा प्रवेश सुनिश्चित करणे.** | | |
| | ▪ जिल्हा परिषदेत सुरू असलेल्या विशेष प्रशिक्षणांची माहिती ठेवणे, खात्री करणे व पर्यवेक्षण करणे. तसेच प्रशिक्षणाचे आयोजन / नियोजन करणे. | ▪ तालुक्यात सुरू असलेल्या विशेष प्रशिक्षणाची माहिती ठेवणे, खात्री करणे, पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे. | ▪ शाळाबाह्य बालकांची अद्ययावत माहिती ठेवणे.<br>▪ शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने शाळाबाह्य बालके शाळेच्या मुख्य प्रवाहात प्रविष्ट करून त्यांची दैनंदिन उपस्थिती टिकविणे.<br>▪ स्थलांतरीत होणाऱ्या / येणाऱ्या बालकांची माहिती अद्यावत स्वरुपात ठेवणे.<br>▪ विशेष प्रशिक्षणाची सुविधा (स्थलांतरीत होणाऱ्या / येणाऱ्या बालकांना) देण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शाळा यांना सहकार्य करणे.<br>▪ शाळाबाह्य बालकांना पुरविण्यात येणारे विशेष प्रशिक्षण व |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद** | **पंचायत समिती** | **ग्रामपंचायत** |
| | | | शाळेत दैनंदिन उपस्थिती तसेच स्थलांतरीत पालकांच्या बालकांची काळजी घेण्याबाबत गाव समुदायाचे उद्बोधन करणे. |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(ज) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांना अनुरूप असणाऱ्या उत्तम दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाची सुनिश्चिती करणे** | | |
| | ▪ शिक्षण हक्क कायद्यातील अनुसूचीनुसार विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्यासाठी शिक्षकांचे समायोजन करणे.<br>▪ शाळा मंजूर असलेल्या ठिकाणी प्रगतीपथावरील व पूर्ण झालेल्या भौतिक सुविधांचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे. | ▪ शिक्षण हक्क कायद्यातील अनुसूचीनुसार विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्यासाठी शिक्षकांचे समायोजन करणे.<br>▪ शाळा मंजूर असलेल्या ठिकाणी प्रगतीपथावरील व पूर्ण झालेल्या भौतिक सुविधांचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे.<br>▪ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची पडताळणी करणे आणि शाळाबाह्य बालकांना शाळेत प्रविष्ठ करून त्यांची उपस्थिती व विशेष | ▪ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची पडताळणी करणे आणि शाळाबाह्य बालकांना शाळेत प्रविष्ठ करून त्यांची उपस्थिती व विशेष प्रशिक्षणासाठी सहकार्य करणे.<br>▪ स्थलांतरीत झालेल्या बालकास कोणत्याही वेळी शाळेत प्रवेश मिळाला किंवा नाही याची खात्री करणे.<br>▪ बालकांना शाळेत नियमित पाठविण्याबाबत गाव समुदायाचे उद्बोधन करणे.<br>▪ ग्रामसभेच्या बैठकीस |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत |
| | | प्रशिक्षणासाठी सहकार्य करणे.<br>▪ स्थलांतरीत झालेल्या बालकास कोणत्याही वेळी शाळेत प्रवेश मिळाला किंवा नाही याची खात्री करणे. | शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व मुख्याध्यापक यांना बोलाविणे. |
| | **(झ) प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम व स्वाध्याय (पाठ्यक्रम) वेळेवर विहित करण्याची खातरजमा करणे** | | |
| | ▪ पाठ्यपुस्तके आणि अध्ययन-अध्यापन साहित्य, इत्यादी प्रत्येक शाळेत वेळेत वितरीत होतील याची खात्री करणे. | ▪ पाठ्यपुस्तके आणि अध्ययन-अध्यापन साहित्य, इत्यादी प्रत्येक शाळेत वेळेत वितरीत करणे.<br>▪ शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळांचे कामकाजाचे दिवस, प्रत्यक्ष अध्यापनाचे तास यानुसार शाळांचे कामकाज चालते किंवा नाही याबाबत खात्री करणे. | ▪ शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळांचे कामकाजाचे दिवस, प्रत्यक्ष अध्यापनाचे तास यानुसार शाळांचे कामकाज चालते किंवा नाही याबाबत खात्री करणे. तक्रार असल्यास नियंत्रण अधिकाऱ्यांना कळविणे.<br>▪ बालकांच्या शाळेतील उपस्थितीबाबत गाव समुदायाचे उद्बोधन करणे आणि बालकांच्या प्रगतीविषयी पालक / समाज यांच्याशी शाळांनी संवाद साधणे. |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत |
| | **(ञ) शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुविधा पुरविणे** | | |
| | ▪ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था / गट साधन केंद्र यांच्याशी चर्चा करून शिक्षक प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करणे.<br>▪ एखादे विशेष प्रशिक्षण शिक्षकांसाठी आवश्यक असल्यास संबंधित संस्थेमार्फत उपलब्ध करून देणे.<br>▪ नवनियुक्त शिक्षकांना सेवापूर्व प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे.<br>▪ समाजाचा शालेय सहभाग वाढविण्यासाठी त्यांचे क्षमता विकसन करण्यासाठी गट साधन केंद्र स्तरावरून द्यावयाच्या प्रशिक्षणाची निश्चिती करणे. | ▪ तालुका स्तरावर देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संनियंत्रण व पर्यवेक्षण करणे. | ▪ स्थानिक शाळेतील शिक्षक विविध स्तरीय प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत याची खातरजमा करणे. |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(थ) त्याच्या अधिकार क्षेत्रातील शाळांच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे** | | |
| | ▪ गाव व तालुका स्तरावरून प्राप्त तक्रारींचे निरसन करणे.<br>▪ जिल्ह्यातील प्राथमिक शाळांची वाढ, व्यवस्थापन, पर्यवेक्षण आणि शाळा भेटी, इत्यादी बाबींचे संनियंत्रण करणे.<br>▪ जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची वाढ, व्यवस्थापन, पर्यवेक्षण आणि शाळा भेटी, इत्यादी बाबींचे संनियंत्रण करणे. | ▪ गाव स्तरावरून प्राप्त तक्रारींचे निरसन करणे.<br>▪ शिक्षक शाळेत नियमित उपस्थित राहतात किंवा नाही याची खात्री करणे.<br>▪ शाळेच्या कामकाजाबाबत येणाऱ्या समस्यांबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी, | ▪ शालेय इमारतीची देखभाल करणे तसेच शाळेचा परिसर फक्त शालेय कामकाजासाठीच वापरला जाईल याचे पर्यवेक्षण करणे.<br>▪ शिक्षक शाळेत नियमित उपस्थित राहतात किंवा नाही याची खात्री करणे.<br>▪ शाळेच्या |

| ग्रामीण | | | |
|---|---|---|---|
| | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत |
| | | जिल्हा परिषद यांच्याशी पत्रव्यवहार करणे.<br>▪ शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांनी शाळा विकास आराखडा तयार केल्याची खातरजमा करणे.<br>▪ शिक्षण हक्क कायद्याशी अनुरूप कामकाज न करणाऱ्या शाळांचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्याशी संवाद साधून शाळा शिक्षण हक्क कायद्याशी अनुरूप करणे.<br>▪ शाळांच्या गरजा निश्चित करणे. त्याप्रमाणे शाळा विकास आराखडा शाळा व्यवस्थापन समितीकडून तयार करून घेणे. | कामकाजाबाबत ग्रामपंचायत समाधानी नसेल तर येणाऱ्या समस्यांबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी गट शिक्षणधिकाऱ्यां मार्फत पत्रव्यवहार करणे.<br>▪ शाळांच्या गरजा निश्चित करणे. त्याप्रमाणे शाळा विकास आराखडा शाळा व्यवस्थापन समितीकडून तयार करून घेणे. |

**परिशिष्ट-ब**

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९**

**स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये**

**शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.आरटीई-१११४/प्र.क्र.११९/एस एम-१ चे जोडपत्र**

| | **शहरी** | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| **सक्षम प्राधिकारी** | आयुक्त, महानगरपालिका | मुख्याधिकारी / कमांडिंग आफिसर |
| **कार्यक्षेत्र** | महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळा | नगरपालिका व कटक मंडळे कार्यक्षेत्रातील त्यांचेद्वारा संचलित शाळा |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(क) प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविणे** | |
| | ▪ अपंग समावेशित शिक्षणातील बालके, अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीची बालके, दुर्बल व वंचित घटकातील बालके आणि मुलींचे शिक्षण याबाबतीत पर्यवेक्षण आणि याद्दच्छिक (Random) तपासणी करणे.<br>▪ महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांच्या शाळा प्रवेशासाठी शासनाच्या, अनुदानित, विना अनुदानित, खाजगी शाळांची माहिती संकलित करणे व ती अद्ययावत ठेवणे.<br>▪ महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांची माहिती जतन करणे, दरवर्षी अद्यावत करणे जेणेकरून स्थलांतरीत झालेल्या व शाळाबाह्य बालकांची माहिती मिळेल.<br>▪ सर्व बालके शाळेत प्रविष्ठ झाली याची खात्री करणे.<br>▪ शाळाबाह्य बालकांना शाळेत दाखल करून घेण्यासाठी बालकांचे व त्यांच्या पालकांचे उद्बोधन करून बालकास शाळेत दाखल | ▪ अपंग समावेशित शिक्षणातील बालके, अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीची बालके, दुर्बल व वंचित घटकातील बालके आणि मुलींचे शिक्षण याबाबतीत पर्यवेक्षण आणि याद्दच्छिक (Random) तपासणी करणे.<br>▪ नगरपालिका / कटक मंडळ कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांच्या शाळा प्रवेशासाठी शासनाच्या, अनुदानित, विना अनुदानित, खाजगी शाळांची माहिती संकलित करणे व ती अद्ययावत ठेवणे.<br>▪ नगरपालिका / कटक मंडळ कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांची माहिती जतन करणे, दरवर्षी |

| | शहरी | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| | करून घेणे.<br>▪ २५ टक्के आरक्षणांतर्गत द्यावयाच्या प्रवेशाची प्रक्रिया पारदर्शक असावी. जेणेकरून प्रत्यक्ष लाभार्थींना प्रवेश मिळेल.<br>▪ वॉर्ड / प्रभाग स्तरावर शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत संनियंत्रण करणे.<br>▪ शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्रयत्न करणे. | अद्यावत करणे जेणेकरून स्थलांतरीत झालेल्या व शाळाबाह्य बालकांची माहिती मिळेल.<br>▪ सर्व बालके शाळेत प्रविष्ठ झाली याची खात्री करणे.<br>▪ शाळाबाह्य बालकांना शाळेत दाखल करून घेण्यासाठी बालकांचे व त्यांच्या पालकांचे उद्बोधन करून बालकास शाळेत दाखल करून घेणे.<br>▪ २५ टक्के आरक्षणांतर्गत द्यावयाच्या प्रवेशाची प्रक्रिया पारदर्शक असावी. जेणेकरून प्रत्यक्ष लाभार्थींना प्रवेश मिळेल.<br>▪ वॉर्ड / प्रभाग स्तरावर शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत संनियंत्रण करणे.<br>▪ शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्रयत्न करणे. |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(ख) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नजिकच्या शाळेच्या उपलब्धतेची सुनिश्चिती करणे.** | |
| | ▪ महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदीनुसार बालकाच्या नजिकच्या क्षेत्रामध्ये शाळा उपलब्ध असल्याची खात्री करणे.<br>▪ निकषानुसार नजिकच्या क्षेत्रात शाळा | ▪ अंतराच्या निकषानुसार बालकाच्या नजिकच्या क्षेत्रामध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध असल्याची खात्री करणे.<br>▪ निकषानुसार नजिकच्या क्षेत्रात |

| | शहरी | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| | उपलब्ध नसल्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडे शाळा उपलब्धतेबाबत प्रस्ताव सादर करणे.<br>▪ स्थानिक पातळीवर समाज, पालक, विद्यार्थी, नगरपालिका / कटक मंडळ सदस्य व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्यामध्ये कायद्याची जनजागृती करणे, त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणे. | शाळा उपलब्ध नसल्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडे शाळा उपलब्धतेबाबत प्रस्ताव सादर करणे.<br>▪ स्थानिक पातळीवर समाज, पालक, विद्यार्थी, नगरपालिका / कटक मंडळ सदस्य व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्यामध्ये कायद्याची जनजागृती करणे, त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणे. |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(ग) वंचित व दुर्बल घटकातील बालकांस कोणत्याही कारणावरुन प्राथमिक शिक्षण घेण्यापासून ते पूर्ण करण्यापासून त्यास प्रतिबंध केला जाणार नाही, याची सुनिश्चिती करणे.** | |
| | ▪ बालकाशी होणाऱ्या भेदभावाबाबत अधिनस्त यंत्रणेची जाणीव जागृती करणे.<br>▪ प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असताना वंचित गट व दुर्बल घटकातील बालकाशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करणे. | ▪ वंचित गट व दुर्बल घटकातील बालकांची शाळेतील उपस्थिती व नियमितता याबाबत खात्री करणे.<br>▪ प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असताना वंचित गट व दुर्बल घटकातील बालकाशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करणे. |
| | **घ) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणाऱ्या चौदा वर्षे वयापर्यंतच्या बालकांचा अभिलेख विहित करण्यात येईल अशा रितीने ठेवणे** | |
| | ▪ प्राथमिक शिक्षणाच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी बालकाचे वय जन्म-मृत्यू विवाह नोंदणी अधिनियम, १९८६ च्या | ▪ प्राथमिक शिक्षणाच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी बालकाचे वय जन्म-मृत्यू विवाह नोंदणी |

| | शहरी | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| | तरतुदीनुसार देण्यात आलेल्या जन्म दाखल्याच्या आधारे किंवा विहीत करण्यात आलेल्या दस्ताऐवजाच्या आधारे प्रवेश निर्धारित करणे.<br>▪ शाळेमार्फत ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांचे वैयक्तिक अभिलेखे अद्यावत करून जतन करणे.<br>▪ असुरक्षित बालकांच्या गटामध्ये दुर्लक्षित / निराधार विशेष गरजाधिष्ठित, एकच पालक असलेली बालके, अनाथ / बेघर, इ. बालकांच्या नोंदी घेणे.<br>▪ यु-डाईस माहितीचे एकत्रिकीकरण व संगणकीकरण करून राज्यास उपलब्ध करणे.<br>▪ राज्य स्तरावरून पुरविण्यात आलेल्या प्रपत्रात नजिकच्या शाळेच्या माहितीचे एकत्रिकीकरण व संगणकीकरण करून राज्यास उपलब्ध करणे. | अधिनियम, १९८६ च्या तरतुदीनुसार देण्यात आलेल्या जन्म दाखल्याच्या आधारे किंवा विहीत करण्यात आलेल्या दस्ताऐवजाच्या आधारे प्रवेश निर्धारित करणे.<br>▪ शाळेमार्फत ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांचे वैयक्तिक अभिलेखे अद्ययावत करून जतन करणे.<br>▪ असुरक्षित बालकांच्या गटामध्ये दुर्लक्षित / निराधार विशेष गरजाधिष्ठित, एकच पालक असलेली बालके, अनाथ / बेघर, इ. बालकांच्या नोंदी घेणे.<br>▪ यु-डाईस माहितीचे एकत्रिकीकरण व संगणकीकरण करून राज्यास उपलब्ध करणे.<br>▪ राज्य स्तरावरून पुरविण्यात आलेल्या प्रपत्रात नजिकच्या शाळेच्या माहितीचे एकत्रिकीकरण व संगणकीकरण करून राज्यास उपलब्ध करणे. |
| | **(ड) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणाऱ्या प्रत्येक बालकाच्या शाळा प्रवेशाची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची खातरजमा करून त्याचे संनियंत्रण करणे** | |
| | ▪ कार्यक्षेत्रातील बालकांचे प्रवेश व उपस्थिती याबाबत संनियंत्रण करणे.<br>▪ स्थलांतरीत (बाहेरून येणारे व बाहेर जाणारे) बालकांचे अभिलेखे जतन करून ठेवणे व ते | ▪ प्रवेशापासून कोणतेही बालक वंचित राहू नये याबाबतची खात्री करणे.<br>▪ स्थलांतरीत (बाहेरून येणारे व |

| | **शहरी** | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| | अद्यावत करणे.<br>▪ प्रवेशासंबधी येणारे अडथळे व उपस्थिती टिकविण्याबाबत वॉर्ड / प्रभाग स्तरावर संनियंत्रण व मार्गदर्शन करणे. | बाहेर जाणारे) बालकांचे अभिलेखे जतन करून ठेवणे व ते अद्यावत करणे.<br>▪ प्रवेशासंबधी येणारे अडथळे व उपस्थिती टिकविण्याबाबत वॉर्ड / प्रभाग स्तरावर संनियंत्रण व मार्गदर्शन करणे. |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(च) शाळेची इमारत, अध्यापन कर्मचारीवर्ग आणि अध्यापन साधन सामग्री तसेच पायाभूत सविधा पुरविणे** | |
| | ▪ कार्यक्षेत्रातील शाळा, शिक्षण हक्क कायद्यानुसार व विद्यार्थी शिक्षक प्रमाणानुसार असाव्यात. जर नसल्यास महानगरपालिकेने आपल्याकडे उपलब्ध असलेल्या स्त्रोतातून शाळा शिक्षण हक्क कायद्यातील निकषानुसार पूर्तता करणे.<br>▪ आवश्यकतेप्रमाणे नवीन शाळा स्थापन करावयाची असल्यास,<br>- बांधकामासाठी लागणारा निधी तात्काळ वितरीत होईल याची खात्री करणे.<br>- शिक्षक उपलब्ध करून घेणे. शिक्षकांचे समायोजन व विषयनिहाय नियुक्त्या करणे.<br>▪ अपुरा शिक्षक वर्ग, शिक्षकांची कार्यक्षमता / शिक्षकांची अनुपस्थिती याबाबत उद्भवणाऱ्या समस्या सोडविणे.<br>▪ शिक्षक-विद्यार्थी प्रमाण शाळेत राखण्याबाबत उद्भवणाऱ्या समस्या सोडविणे. | ▪ कार्यक्षेत्रातील शाळा शिक्षण हक्क कायद्यानुसार व विद्यार्थी शिक्षक प्रमाणानुसार असाव्यात. जर नसल्यास नगरपालिका / कटक मंडळाने आपल्याकडे उपलब्ध असलेल्या स्त्रोतातून शाळा शिक्षण हक्क कायद्यातील निकषानुसार पूर्तता करणे.<br>▪ अपुरा शिक्षक वर्ग, शिक्षकांची कार्यक्षमता / शिक्षकांची अनुपस्थिती याबाबत उद्भवणाऱ्या समस्या सोडविणे.<br>▪ शिक्षक-विद्यार्थी प्रमाण शाळेत राखण्याबाबत उद्भवणाऱ्या समस्या सोडविणे. |
| | **(छ) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेली विशेष प्रशिक्षण सुविधा पुरविणे आणि स्थलांतरीत कुटुंबातील बालकांचा प्रवेश सुनिश्चित करणे.** | |
| | ▪ शाळाबाह्य बालकांची अद्ययावत माहिती | ▪ शाळाबाह्य बालकांची अद्ययावत |

| | शहरी | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| | ठेवणे.<br>▪ शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने शाळाबाह्य बालके शाळेच्या मुख्य प्रवाहात प्रविष्ठ करून त्यांची दैनंदिन उपस्थिती टिकविणे.<br>▪ विशेष प्रशिक्षणाची सुविधा शक्यतोवर शाळेतच करावी, शक्य नसल्यास शाळेपासून जवळ सुरक्षित ठिकाणी विशेष प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शाळा यांना सहकार्य करणे.<br>▪ शाळाबाह्य बालकांना पुरविण्यात येणारे विशेष प्रशिक्षण व शाळेत दैनंदिन उपस्थिती तसेच स्थलांतरीत पालकांच्या बालकांची काळजी घेण्याबाबत वॉर्ड / प्रभाग समुदायाचे उद्बोधन करणे.<br>▪ स्थलांतरीत होणाऱ्या / येणाऱ्या बालकांची माहिती अद्यावत स्वरुपात ठेवावी.<br>▪ महानगरपालिकेत सुरू असलेल्या विशेष प्रशिक्षणांची माहिती ठेवणे, खात्री करणे व पर्यवेक्षण करणे. | माहिती ठेवणे.<br>▪ शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने शाळाबाह्य बालके शाळेच्या मुख्य प्रवाहात प्रविष्ठ करून त्यांची दैनंदिन उपस्थिती टिकविणे.<br>▪ विशेष प्रशिक्षणाची सुविधा शक्यतोवर शाळेतच करावी, शक्य नसल्यास शाळेपासून जवळ सुरक्षित ठिकाणी विशेष प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शाळा यांना सहकार्य करणे.<br>▪ शाळाबाह्य बालकांना पुरविण्यात येणारे विशेष प्रशिक्षण व शाळेत दैनंदिन उपस्थिती तसेच स्थलांतरीत पालकांच्या बालकांची काळजी घेण्याबाबत वॉर्ड / प्रभाग समुदायाचे उद्बोधन करणे.<br>▪ स्थलांतरीत होणाऱ्या / येणाऱ्या बालकांची माहिती अद्यावत स्वरुपात ठेवावी. |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | **(ज) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांना अनुरूप असणाऱ्या उत्तम दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाची सुनिश्चिती करणे** | |
| | ▪ शिक्षण हक्क कायद्यातील अनुसूचीनुसार विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्यासाठी शिक्षकांचे समायोजन करणे.<br>▪ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची पडताळणी करणे | ▪ शिक्षण हक्क कायद्यातील अनुसूचीनुसार विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्यासाठी शिक्षकांचे समायोजन करणे. |

| | शहरी | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| | आणि शाळाबाह्य बालकांना शाळेत प्रविष्ठ करून त्यांची उपस्थिती व विशेष प्रशिक्षणासाठी सहकार्य करणे.<br>▪ स्थलांतरीत झालेल्या बालकास कोणत्याही वेळी शाळेत प्रवेश मिळाला किंवा नाही याची खात्री करणे.<br>▪ बालकांना शाळेत नियमित पाठविण्याबाबत वॉर्ड / प्रभाग समुदायाचे उद्बोधन करणे.<br>▪ शाळा मंजूर असलेल्या ठिकाणी प्रगतीपथावरील व पूर्ण झालेल्या भौतिक सुविधांचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे. | ▪ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची पडताळणी करणे आणि शाळाबाह्य बालकांना शाळेत प्रविष्ठ करून त्यांची उपस्थिती व विशेष प्रशिक्षणासाठी सहकार्य करणे.<br>▪ स्थलांतरीत झालेल्या बालकास कोणत्याही वेळी शाळेत प्रवेश मिळाला किंवा नाही याची खात्री करणे.<br>▪ बालकांना शाळेत नियमित पाठविण्याबाबत वॉर्ड / प्रभाग समुदायाचे उद्बोधन करणे.<br>▪ शाळा मंजूर असलेल्या ठिकाणी प्रगतीपथावरील व पूर्ण झालेल्या भौतिक सुविधांचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे. |
| | **(झ) प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम व स्वाध्याय (पाठ्यक्रम) वेळेवर विहित करण्याची खातरजमा करणे** | |
| | ▪ पाठ्यपुस्तके आणि अध्ययन-अध्यापन साहित्य, इत्यादी प्रत्येक शाळेत वेळेत वितरीत होतील याची खात्री करणे.<br>▪ शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळांचे कामकाजाचे दिवस, प्रत्यक्ष अध्यापनाचे तास यानुसार शाळांचे कामकाज चालते किंवा नाही याबाबत खात्री करणे. तक्रार असल्यास नियंत्रण अधिकाऱ्यांना कळविणे.<br>▪ बालकांच्या शाळेतील उपस्थितीबाबत वॉर्ड / प्रभाग समुदायाचे उद्बोधन करणे आणि बालकांच्या प्रगतीविषयी पालक / समाज | ▪ पाठ्यपुस्तके आणि अध्ययन-अध्यापन साहित्य, इत्यादी प्रत्येक शाळेत वेळेत वितरीत होतील याची खात्री करणे.<br>▪ शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळांचे कामकाजाचे दिवस, प्रत्यक्ष अध्यापनाचे तास यानुसार शाळांचे कामकाज चालते किंवा नाही याबाबत खात्री करणे. तक्रार असल्यास नियंत्रण अधिकाऱ्यांना कळविणे. |

| | शहरी | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| | यांच्याशी शाळांनी संवाद साधणे. | ▪ बालकांच्या शाळेतील उपस्थितीबाबत वॉर्ड / प्रभाग समुदायाचे उद्बोधन करणे आणि बालकांच्या प्रगतीविषयी पालक / समाज यांच्याशी शाळांनी संवाद साधावा. |
| | **(ञ) शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुविधा पुरविणे** | |
| | ▪ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था / शहर साधन केंद्र यांच्याशी चर्चा करून शिक्षक प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करणे.<br>▪ एखादे विशेष प्रशिक्षण शिक्षकांसाठी आवश्यक असल्यास संबंधित संस्थेमार्फत उपलब्ध करून देणे.<br>▪ समाजाचा शालेय सहभाग वाढविण्यासाठी त्यांचे क्षमता विकसन करण्यासाठी शहर साधन केंद्र स्तरावरून द्यावयाच्या प्रशिक्षणाची निश्चिती करणे.<br>▪ वॉर्ड / प्रभागस्तरीय शिक्षक प्रशिक्षणासाठी भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे.<br>▪ स्थानिक शाळेतील शिक्षक विविध स्तरीय प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत याची खातरजमा करणे. | ▪ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था / शहर साधन केंद्र यांच्याशी चर्चा करून शिक्षक प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करणे.<br>▪ एखादे विशेष प्रशिक्षण शिक्षकांसाठी आवश्यक असल्यास संबंधित संस्थेमार्फत उपलब्ध करून देणे.<br>▪ समाजाचा शालेय सहभाग वाढविण्यासाठी त्यांचे क्षमता विकसन करण्यासाठी शहर साधन केंद्र स्तरावरून द्यावयाच्या प्रशिक्षणाची निश्चिती करणे.<br>▪ वॉर्ड / प्रभागस्तरीय शिक्षक प्रशिक्षणासाठी भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे.<br>▪ स्थानिक शाळेतील शिक्षक विविध स्तरीय प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत याची खातरजमा करणे. |
| | **(थ) त्याच्या अधिकार क्षेत्रातील शाळांच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे** | |
| | ▪ वॉर्ड / प्रभाग स्तरावरून प्राप्त तक्रारींचे | ▪ वॉर्ड / प्रभाग स्तरावरून प्राप्त |

| | शहरी | |
|---|---|---|
| | **महानगरपालिका** | **नगरपालिका / कटक मंडळे** |
| **शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम ९ नुसार कर्तव्य** | निरसन करणे.<br>▪ शालेय इमारतीची देखभाल करणे तसेच शाळेचा परिसर फक्त शालेय कामकाजासाठीच वापरला जाईल याचे पर्यवेक्षण करणे.<br>▪ शिक्षक शाळेत नियमित उपस्थित राहतात किंवा नाही याची खात्री करणे.<br>▪ शाळेच्या कामकाजाबाबत महानगरपालिका समाधानी नसेल तर येणाऱ्या समस्यांबाबत शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका यांच्याशी पत्रव्यवहार करावा.<br>▪ शिक्षण हक्क कायद्याशी अनुरूप कामकाज न करणाऱ्या शाळांचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्याशी संवाद साधून शाळा, शिक्षण हक्क कायद्याशी अनुरूप करणे.<br>▪ शाळांच्या गरजा निश्चित करणे. त्याप्रमाणे शाळा विकास आराखडा, शाळा व्यवस्थापन समितीकडून तयार करून घेणे. | तक्रारींचे निरसन करणे.<br>▪ शालेय इमारतीची देखभाल करणे तसेच शाळेचा परिसर फक्त शालेय कामकाजासाठीच वापरला जाईल याचे पर्यवेक्षण करणे.<br>▪ शिक्षक शाळेत नियमित उपस्थित राहतात किंवा नाही याची खात्री करणे.<br>▪ शाळेच्या कामकाजाबाबत नगरपालिका / कटक मंडळ समाधानी नसेल तर येणाऱ्या समस्यांबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी पत्रव्यवहार करावा.<br>▪ शिक्षण हक्क कायद्याशी अनुरूप कामकाज न करणाऱ्या शाळांचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्याशी संवाद साधून शाळा, शिक्षण हक्क कायद्याशी अनुरूप करणे.<br>▪ शाळांच्या गरजा निश्चित करणे. त्याप्रमाणे शाळा विकास आराखडा, शाळा व्यवस्थापन समितीकडून तयार करून घेणे. |